सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर तरतूदीमधून राज्यातील कारागृहांत वैद्यकीय सोयी सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणे बाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-०९१७/प्र.क्र. ११०/तुरुंग-२
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २० जानेवारी, २०१८

वाचा

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. मेंटेनन्स/वैद्यकीय उपकरणे /२०१७-१८/४४७१/कक्ष-६(१) दिनांक ६/०६/२०१७ व २६.१०.२०१७
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.

प्रस्तावना :-

राज्यातील कारागृहांत वैद्यकीय सोयी सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर तरतूदीमधून रुपये २१ लक्ष (रुपये एकवीस लक्ष फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी संदर्भ क्र.१ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार रु. २०,९७,७९३/-इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी खर्च करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

राज्यातील कारागृहांत वैद्यकीय सोयी सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास या शासननिर्णयान्वये खालील अटींच्या अधीन मंजूरी देण्यात येत आहे.

अ) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग ॥।/उ.४ दिनांक १.१२.२०१६ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

आ) उपकरणाचे खरेदीमुल्य बाजारभावापेक्षा अधिक राहणार नाही तसेच उपकरणाचा दर्जा उच्च प्रतीचा राहील, याची खात्री करावी.

राज्यातील कारागृहांत वैद्यकीय सोयी सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी, खरेदी करावयाच्या वैद्यकीय उपकरणांची यादी :-

अ.क्र	उपकरणांचे नाव	किंमत	नग	एकुण
१	ॲम्ब्युलंन्स	६,४१,७६४/-	३	१९,२५,२९३/-
२	फ्रिज	११,५००/-	१५	१,७२,५००/-
			एकुण	२०,९७,७९३/-

२. वित्त विभाग शासन निर्णय क्र विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनिमय भाग-२, दिनांक १७ एप्रिल २०१५ भाग - पहिला उपविभाग दोन मधील अ.क्र.४ नियम क्र ७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७ च्या परिशिष्टात नमूद केलेल्या अटीस अधीन राहून प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. राज्यातील कारागृहांत वैद्यकीय सोयी सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर झालेल्या रुपये २१ लक्ष (रुपये एकवीस लक्ष फक्त) इतक्या रकमेपैकी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक ३०.६.२०१७ नुसार ७०% निधीच्या मर्यादेत म्हणजेच रु. १४.७० लक्ष (रुपये चौदा लक्ष सत्तर हजार फक्त) खर्च करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर खरेदी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार व विहित पद्धतीने करण्यात यावी.

४. यावरील होणारा खर्च मागणी क्र. मागणी क्र बी-५, मुख्य लेखाशिर्ष २०५६ तुरुंग (००)(१०१) तुरुंग (००)(१७) तुरुंगातील वैद्यकीय सुविधा वाढविणे (२०५६ ०२१३) (योजनांतर्गत योजना) (५२) यंत्रसामुग्री व साधन सामुग्री या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन सन २०१७-१८ या वर्षाकरीता उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२०१४२८४४२७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L.Pawara

Digitally signed by Jaysing L.Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f11b49d608f53d77adcefe8115025d93bfe9dbe e3f61b1c150d64818cb09f90c, cn=Jaysing L.Pawara
Date: 2018.01.20 14:19:24 +05'30'

(ज.ल.पावरा)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. कारागृह महानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. कारागृह उपमहानिरीक्षक, (पश्चिम विभाग)/पूणे,
४. कारागृह उपमहानिरीक्षक, (मध्य विभाग)/औरंगाबाद,
५. कारागृह उपमहानिरीक्षक, (पूर्व विभाग)/नागपूर,
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
९. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- २, नागपूर,
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११. अवर सचिव, वित्त विभाग, (व्यय ८/अर्थसंकल्प ११) मंत्रालय, मुंबई-३२,
१२. अवर सचिव (बीयुडी-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
१३. निवड नस्ती (तुरुंग-२).